# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०८/०५/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

आज दिनांक ०८/०५/२०२३ रोजी पासून उल्हासनगर महानगरपालिका, महिला व बालकल्याण विभागामार्फत, मोफत स्तनाचा कर्करोग(ब्रेस्ट कॅन्सर) आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

उल्हासनगर शहरातील दारीद्रय रेषेखालील / आर्थिक दृष्टया दुर्बल,दिव्यांग, विधवा तसेच गरीब व गरजु महिलांची स्तनाचा कर्करोग (ब्रेस्ट कॅन्सर) दि. ०८/०५/२०२३ रोजी सकाळी ठिक १०.०० ते ०४.०० पर्यंत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील वय – ४० वर्षाच्या पुढील महिला यांच्या स्तनाचा मोफत् कर्करोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबीरास मा. श्री. अजीज शेख, आयुक्त, मा. डॉ. करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त् (सेवा) / मबाकवि, मा. श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा अधिकारी, मा. श्रीम. प्रतिभा कुलकर्णी, महापालिका सचिव, मा. श्रीम. छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी व श्री. नितेश रंगारी, महिला व बालकल्याण विभाग, विभाग प्रमुख उपस्थित होते.

सदर शिबिरामार्फत वयवर्ष ४० च्या पुढील महिलांसाठी मोफत तपासणी खालील ठिकाणी ठेवलेली आहे.

**सोमवार** दि. ०८ मे, २०२३ रोजी सकाळी १०.०० ते ०४ वा. पर्यत उल्हासनगर महानगरपालिका, मुख्यालय, उल्हासनगर – ३,

**मंगळवार** दि. ०९ मे, २०२३ रोजी सकाळी १०.०० ते ०४.०० वा. पर्यत प्रभाग समिती क्र. १ कार्यालय, गोलमैदान, उल्हासनगर – १.

**बुधवार** दि. १० मे, २०२३ रोजी सकाळी १०.०० ते ०४ वा. पर्यत प्रभाग समिती क्र. २ कार्यालय, सपना गार्डन, उल्हासनगर – ३,

**गुरुवार** दि. ११ मे, २०२३ रोजी सकाळी १०.०० ते ०४.०० वा. पर्यंत प्रभाग समिती क्र.३ कार्यालय, मनपा शाळा क्र. १४, उल्हासनगर – ४ तसेच

**शुक्रवारी** दि. १२ मे, २०२३ रोजी सकाळी १०.०० ते ०४.०० वा. पर्यंत प्रभाग समिती क्र. ४ कार्यालय म.न.पा शाळा क्र. १९, उल्हासनगर – ४ येथे ठेवण्यात येत आहे.

मा. आयुक्त सो., यांनी उद्‌घाटन प्रसंगी मुख्यालयातील सर्व महिलांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे सूचित केले.

तरी उल्हासनगर शहरातील जास्तीत जास्त महिलांनी यात सहभाग घेऊन मोफत स्तनाचा कर्करोग आरोग्य तपासणीचा लाभ घ्यावा.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.